SAMPLE CONTENT

# मराठी (HL)

# व्याकरण - भाषाभ्यास व उपयोजित लेखन

पाठ्यपुस्तकावर आधारित




सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

हितेश कल्याणकर
BMM-Advertising

अमृत पुलेकर
M.A., B.Ed.


इयत्ता आठवी

(मराठी माध्यम)


Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ०४
यांच्याद्वारे नियोजित पाठ्यपुस्तकावर आधारित.

# मराठी (HL)

# व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन

## इयत्ता आठवी

### ठळक वैशिष्ट्ये

- पाठ्यपुस्तकातील व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखनावर आधारित सर्व कृती समाविष्ट
- भाषाभ्यास विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सुलभ स्पष्टीकरण
- भाषाभ्यास विभागात अंतर्भूत घटकांचा परिपूर्ण सराव
- उत्तरे लिहिण्याकरिता पर्याप्त जागा उपलब्ध
- उत्तरांचा पडताळा घेण्याकरिता उत्तरसूची समाविष्ट
- उपयोजित लेखनातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण अंतर्भूत
- उपयोजित लेखनातील प्रत्येक घटकावर आधारित सोडवलेल्या भरपूर कृती
- उपयोजित लेखनातील प्रत्येक घटकामध्ये सरावासाठी मुबलक कृती समाविष्ट

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 6432

TEID: 2497

# प्रस्तावना

इयत्ता आठवीचे वर्ष हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. दहावीसारख्या महत्त्वपूर्ण वर्षाची पायाभरणी या वर्षापासून सुरू होते. या वर्षात अभ्यासावयाच्या अनेकविध विषयांपैकी मराठी हा भाषा विषय विद्यार्थ्यांच्या उत्तम जडणघडणीकरिता महत्त्वपूर्ण आहे. दहावीच्या दृष्टीने विचार केला, तर व्याकरण, भाषाभ्यास आणि उपयोजित लेखन यांसाठी मराठी विषयात ४० गुण देण्यात आले आहेत. त्यामुळे, मराठी विषयात उत्तम गुण मिळवण्यासाठी, इयत्ता आठवीपासूनच व्याकरण घटकांचा सखोल अभ्यास करण्याची सवय लागावी यासाठी, तसेच भाषेवर प्रभुत्व मिळवून दहावीकरिता तयार राहण्यासाठी **लेझी बोन एज्युकेशनचे मराठी (HL) व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन इयत्ता आठवी** हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती सोपवताना आम्हांला आनंद होत आहे.

व्याकरणाच्या पायावर भाषेची इमारत उभी राहते. हा पाया मजबूत असेल, तर भाषेवर प्रभुत्व मिळवणे सोपे जाते, तसेच व्याकरण व भाषाभ्यासात अधिकाधिक गुण मिळवणे सहज शक्य होते. यासाठी व्याकरण घटकांच्या मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांची ही गरज ओळखून आम्ही या संकल्पनांचे सहज सोप्या भाषेत स्पष्टीकरण देण्याबरोबरच भरपूर सरावकृती समाविष्ट केल्या आहेत. मूळ व्याकरण व भाषिक घटक यांवरील विद्यार्थ्यांची पकड मजबूत होईल याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

उपयोजित लेखन म्हणजे नवनिर्मितीचा आनंद! विद्यार्थ्यांना स्वभाषेत लिखाणास प्रवृत्त करणे हा याच्या अभ्यासामागील मूळ उद्देश आहे. उपयोजित लेखनामध्ये समाविष्ट घटकांचे लेखन कसे करावे? कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात? कोणत्या गोष्टी टाळाव्यात? यासंदर्भातील सविस्तर विवेचन प्रत्येक घटकाच्या प्रारंभी देण्यात आले आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी अनेक नमुना कृतींनी यातील सारे घटक समृद्ध करण्यात आले आहेत. यामुळे, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व सृजनशीलतेला वाव मिळेल याची आम्हांला खात्री आहे.

व्याकरण व भाषाभ्यासावर आधारित भरपूर कृती, उपयोजित लेखनातील १६ पत्रे, ६ बातम्या, १० जाहिराती, १० कथा, ५ गद्य आकलन, ६ सारांशलेखन, ५ संवादलेखन, ६ सूचनाफलक, ५ शीर्षकलेखन आणि २९ निबंध एवढा विपुल अभ्यास झाल्यानंतर मुलांना जास्तीत जास्त गुण मिळवणे शक्य होईल.

सरावानेच सिद्धी प्राप्त होते असे म्हणतात. हा सराव योग्य दिशेने असावा याकरिता हे पुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती :** प्रथम

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय support@lazybone.in या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी बालभारती; चौथे पुनर्मुद्रण: २०२२' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **भाषाभ्यास** | | |
| • | **व्याकरण** | | |
| १. | शब्दांच्या जाती | | १ |
| २. | सामान्यरूप, विभक्ती, प्रत्यय | | १० |
| ३. | समास | | १४ |
| ४. | अलंकार | | १९ |
| ५. | वृत्त | | २४ |
| ६. | प्रयोग | | ३० |
| ७. | संधी | | ३४ |
| ८. | वाक्यांचे प्रकार | | ४० |
| ९. | काळ | | ४३ |
| १०. | वाक्प्रचार | | ४७ |
| • | **भाषिक घटक** | | |
| १. | शब्दसंपत्ती | | |
| | • | समानार्थी शब्द | ५९ |
| | • | विरुद्धार्थी शब्द | ६२ |
| | • | आलंकारिक शब्द | ६४ |
| | • | शब्दसमूहाबद्दल एक शब्द | ६६ |
| | • | वचन | ६८ |
| | • | लिंग | ७१ |
| | • | नादानुकारी शब्द | ७३ |
| | • | एका शब्दाचे भिन्न अर्थ | ७४ |
| | • | उपसर्ग आणि प्रत्यय | ७५ |
| | • | एका शब्दापासून अनेक शब्द | ७७ |
| | • | अकारविल्हे | ७७ |
| | • | म्हणी | ७८ |
| | • | यमक | ८० |
| २. | लेखननियमांनुसार लेखन | | ८१ |
| ३. | विरामचिन्हे | | ८५ |
| | सराव कृतिपत्रिका – १ | | ८८ |
| | सराव कृतिपत्रिका – २ | | ९० |
| | उत्तरे | | ९२ |
| | **उपयोजित लेखन** | | |
| १. | पत्रलेखन | | ११० |
| २. | जाहिरातलेखन | | १२४ |
| ३. | बातमीलेखन | | १३२ |


Sample Content

| | | |
|---|---|---|
| ४. | कथालेखन | १३८ |
| ५. | गद्य आकलन | १४४ |
| ६. | सारांशलेखन | १४९ |
| ७. | संवादलेखन | १५२ |
| ८. | शीर्षकलेखन | १५६ |
| ९. | सूचनाफलक | १५९ |
| १०. | निबंधलेखन | |

**(वर्णनात्मक)**

| | निबंध | पृष्ठ क्र. | | निबंध | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | माझी आवडती कला | १६१ | ५. | माझे गाव | १६३ |
| २. | रेल्वे स्थानकावरील एक तास | १६२ | ६. | माझा आवडता ऋतू | १६४ |
| ३. | माझा आवडता पक्षी | १६२ | • | सराव कृती | १६४ |
| ४. | माझे आवडते पर्यटनस्थळ | १६३ | | | |

**(प्रसंगलेखन)**

| | निबंध | पृष्ठ क्र. | | निबंध | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | स्वच्छता अभियान - एक अनुभव | १६५ | ४. | माझा संस्मरणीय वाढदिवस ! | १६७ |
| २. | आमची जंगलसफारी | १६५ | ५. | चांदण्या रात्रीतील सहल | १६७ |
| ३. | मी पाहिलेला अपघात | १६६ | • | सराव कृती | १६८ |

**(आत्मकथनात्मक निबंध)**

| | निबंध | पृष्ठ क्र. | | निबंध | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | गोधडीचे आत्मकथन | १६९ | ५. | नदीचे आत्मकथन | १७१ |
| २. | जुन्या पुस्तकाचे आत्मकथन | १६९ | ६. | सैनिकाचे आत्मकथन | १७१ |
| ३. | शेतकऱ्याचे आत्मकथन | १७० | ७. | चिमणीचे आत्मवृत्त | १७२ |
| ४. | झाडाचे आत्मकथन | १७० | • | सराव कृती | १७३ |

**(वैचारिक लेखन)**

| | निबंध | पृष्ठ क्र. | | निबंध | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | वाचनाची गरज | १७३ | ४. | वर्तमानपत्राचे महत्त्व | १७५ |
| २. | पाणी अडवा, पाणी जिरवा | १७४ | ५. | दुष्काळ – मानवनिर्मित की निसर्गनिर्मित ? | १७६ |
| ३. | युग संगणकाचे | १७४ | • | सराव कृती | १७६ |

**(कल्पनाप्रधान निबंध)**

| | निबंध | पृष्ठ क्र. | | निबंध | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | मी फुलपाखरू झालो तर/झाले तर... | १७७ | ५. | वीज नसती तर... | १७९ |
| २. | नदी बोलू लागली तर... | १७८ | ६. | सूर्य उगवला नाही तर... | १८० |
| ३. | परीक्षा नसत्या तर... | १७८ | • | सराव कृती | १८० |
| ४. | मी शिक्षक झालो तर... | १७९ | | | |


**[टीप : पाठाखाली दिलेले व्याकरण, भाषाभ्यास व उपयोजित लेखनावर आधारित प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

Sample Content

व्याकरण विभाग

# १ शब्दांच्या जाती


कोणत्याही अर्थपूर्ण शब्दसमूहाला शब्द असे म्हटले जाते. शब्द हा वाक्यातील महत्त्वाचा घटक असतो. शब्दाच्या एकूण आठ जाती असतात. यातील चार जाती सव्यय असून इतर चार जाती अव्यय असतात. यांना अनुक्रमे विकारी शब्द आणि अविकारी शब्द असेदेखील म्हटले जाते. वाक्यात येणाऱ्या शब्दाच्या कार्यावरून त्याची जात ठरते.

**सव्यय (विकारी शब्द) :** सव्ययांमध्ये लिंग, वचन आणि विभक्ती यांमुळे बदल होतो.

**उदा.** 'कुत्रा' हे नाम आहे. पुल्लिंग रूप -कुत्रा, स्त्रीलिंगी रूप - कुत्री, अनेकवचन - कुत्रे, विभक्ती - कुत्र्याला अशा रितीने बदल संभवतात.

**अव्यय (अविकारी शब्द) :** अव्ययांमध्ये लिंग, वचन आणि विभक्ती यांमुळे बदल होत नाही.


**उदा.** 'किंवा' हे उभयान्वयी अव्यय आहे. त्यात वरील घटकांनुसार कोणतेही बदल होत नाहीत.




## नाम

**कोणतीही व्यक्ती, वस्तू, प्राणी, जागा किंवा गुण यांना दिले जाणारे नाव म्हणजेच 'नाम' होय.**

**उदा.** रमेश, पुस्तक, घोडा, ठाणे, आनंद, इत्यादी.




१. **सामान्यनाम :** एकाच जातीच्या पदार्थांच्या समान गुणधर्मामुळे त्या वस्तूला दिलेले नाव म्हणजे 'सामान्यनाम' होय.
**उदा.** मुलगा, नदी, पर्वत, देश, इत्यादी.

२. **विशेषनाम :** विशिष्ट व्यक्ती, प्राणी किंवा वस्तूचा बोध करून देणाऱ्या नामाला 'विशेषनाम' म्हणतात.
**उदा.** अजय, गंगा, हिमालय, भारत, इत्यादी.

३. **भाववाचकनाम :** व्यक्तीच्या, प्राण्यांच्या, वस्तूच्या प्रत्यक्ष किंवा काल्पनिक गुणधर्म किंवा भावभावनांना दिलेले नाव म्हणजे 'भाववाचक नाम' होय.
**उदा.** श्रीमंती, सौंदर्य, आनंद, प्रामाणिकपणा, नम्रता, हुशारी, इत्यादी.

**लक्षात ठेवा**

- केवळ सामान्यनामाचे अनेकवचन होते. इतर दोन्ही प्रकारच्या नामांचे अनेकवचन होत नाही.

Sample content

# सर्वनाम

**एकाच नामाचा वापर वारंवार केला जात असेल, तर त्याऐवजी वापरल्या जाणाऱ्या शब्दाला 'सर्वनाम' म्हणतात.**
**उदा.** मी, आम्ही, तू, तुम्ही, तो, हे, तो, कोण, इत्यादी.

**सर्वनामाचे प्रकार**

- पुरुषवाचक सर्वनाम
  - १. प्रथम पुरुषवाचक
  - २. द्वितीय पुरुषवाचक
  - ३. तृतीय पुरुषवाचक
- दर्शक सर्वनाम
- प्रश्नार्थक सर्वनाम
- संबंधी सर्वनाम
- अनिश्चित सर्वनाम
- आत्मवाचक सर्वनाम

**सर्वनामाचे प्रकार :**

१. **पुरुषवाचक सर्वनाम :**

i. **प्रथम पुरुषवाचक सर्वनाम :** बोलणारा स्वतःचा उल्लेख करताना यांचा वापर करतो. **उदा.** मी, आम्ही, आपण, स्वतः

ii. **द्वितीय पुरुषवाचक सर्वनाम :** ज्याच्याशी बोलायचे त्याचा उल्लेख करताना यांचा वापर होतो. **उदा.** तू, तुम्ही, आपण इत्यादी.

iii. **तृतीय पुरुषवाचक सर्वनाम :** ज्यांच्याविषयी बोलायचे त्या व्यक्ती किंवा वस्तूचा उल्लेख करताना याचा वापर होतो. **उदा.** तो, ती, ते, त्या इत्यादी.

२. **दर्शक सर्वनाम :** जवळची किंवा दूरची वस्तू दाखवण्यासाठी यांचा उपयोग होतो. **उदा.** हा, ही, हे, तो, ती, ते.

३. **प्रश्नार्थक सर्वनाम :** वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी याचा उपयोग होतो. **उदा.** कोण, काय, कोणाला, कोणी, कोणास.

४. **संबंधी सर्वनाम :** वाक्यात पुढे येणाऱ्या दर्शक सर्वनामाशी संबंध दाखवणारा सर्वनाम. **उदा.** जो-जी-जे, जे-ज्या.

५. **अनिश्चित सर्वनाम :** काही सर्वनामे वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी न येता ती वाक्यांत कोणत्या नामांबद्दल आली आहेत हे निश्चित सांगता येत नाही. अशा सर्वनामांना अनिश्चित सर्वनामे म्हणतात. **उदा.** कोणी, कोणास, काय.

६. **आत्मवाचक सर्वनाम :** सर्वनामाचा अर्थ जेव्हा स्वतः असा होतो तेव्हा ते आत्मवाचक सर्वनाम असते. **उदा.** स्वतः, आपण.

# विशेषण

**नामाबद्दल विशेष किंवा अधिक माहिती सांगणारा शब्द म्हणजे 'विशेषण' होय. विशेषण ज्या नामाबद्दल विशेष माहिती सांगते त्याला 'विशेष्य' म्हणतात.**
**उदा.** **उंच** मुलगा, **सुंदर** चित्र, **शुभ्र** बगळा, **हिरवे** झाड.

**विशेषणाचे प्रकार**

- गुणवाचक विशेषण
- संख्यावाचक विशेषण
- सार्वनामिक विशेषण

१. **गुणवाचक विशेषण :** नामाचा गुण सांगणारा शब्द म्हणजेच 'गुणवाचक विशेषण' होय.
**उदा.** काळा दगड, हुशार मुलगी, सुंदर पक्षी.

२. **संख्यावाचक विशेषण :** नामाची संख्या सांगणारा शब्द म्हणजेच 'संख्यावाचक विशेषण' होय.
**उदा.** दहा मुले, नववी इयत्ता, काही माणसे, अनेक झाडे.

३. **सार्वनामिक विशेषण :** नामाच्या अगोदर येणारे सर्वनाम त्या नामाबद्दल अधिक माहिती देत असेल, तर ते सर्वनाम न राहता सार्वनामिक विशेषण होते.
**उदा.** तो मुलगा माझा मित्र आहे. ही गोष्ट मी वाचली आहे.

Sample Content

## क्रियापद

**वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या क्रियावाचक शब्दाला 'क्रियापद' असे म्हणतात. वाक्यातील क्रिया दाखवणारा शब्द म्हणजे क्रियापद होय. क्रियापदामुळे वाक्याचा अर्थ पूर्ण होतो.**

**उदा.** आज गुरुजींनी वर्गात गणित शिकवले.

या वाक्यात 'शिकवले' या क्रियावाचक शब्दामुळे वाक्याचा अर्थ पूर्ण झाला. म्हणून, 'शिकवले' हे क्रियापद आहे.

**क्रियापदाचे प्रकार**

सकर्मक | अकर्मक | संयुक्त | सहाय्यक

१. **सकर्मक क्रियापद :** वाक्याचा अर्थ पूर्ण होण्याकरिता जेव्हा कर्माची गरज असते, त्या क्रियापदाला 'सकर्मक क्रियापद' असे म्हणतात.

**उदा.** मितालीने आंबा खाल्ला.

वरील वाक्यात 'आंबा' या कर्माची आवश्यकता आहे. 'मितालीने खाल्ला' एवढेच वाक्य दिले असते, तर त्याचा अर्थ पूर्ण झाला नसता. म्हणूनच, 'खाल्ला' हे सकर्मक क्रियापद आहे.

२. **अकर्मक क्रियापद :** जेव्हा वाक्याचा अर्थ पूर्ण होण्यासाठी कर्माची आवश्यकता नसते, तेव्हा त्या वाक्यातील क्रियापदाला 'अकर्मक क्रियापद' असे म्हणतात.

**उदा.** तो पाटावर बसला.

'तो बसला' या वाक्यालादेखील पूर्ण अर्थ आहे. 'बसला' या क्रियापदाला कर्माची आवश्यकता नाही. त्यामुळे, 'बसला' हे अकर्मक क्रियापद आहे.

३. **संयुक्त क्रियापद :** धातुसाधित आणि क्रियापद यांनी मिळून बनलेल्या क्रियापदास संयुक्त क्रियापद असे म्हणतात; परंतु या दोन्ही शब्दांतून कोणत्याही एकाच क्रियेचा बोध होणे आवश्यक असते.

धातुसाधित + सहाय्यक क्रियापद = संयुक्त क्रियापद

**उदा.** मुले सुरात गाऊ लागली.

(गाऊ – धातुसाधित, लागली – सहाय्यक क्रियापद, गाऊ लागली – संयुक्त क्रियापद)

४. **सहाय्यक क्रियापद :** जेव्हा धातुसाधित आणि क्रियापद हे दोन्ही मिळून एकाच क्रियेचा बोध होतो तेव्हा धातुसाधिताला मदत/सहाय्य करणाऱ्या क्रियापदाला सहाय्यक क्रियापद असे म्हणतात.

**उदा.** एवढी गोष्ट ऐकून जा.

(ऐकून – धातुसाधित, जा – सहाय्यक क्रियापद)

## क्रियाविशेषण अव्यय

**क्रियापदाबद्दल अधिक माहिती देणाऱ्या अविकारी शब्दाला 'क्रियाविशेषण अव्यय' म्हणतात. वाक्यातील क्रिया केव्हा, कोठे, कशी आणि किती वेळा घडली याविषयीचे उत्तर म्हणजे क्रियाविशेषण अव्यय होय.**

**उदा.** काल रविवार होता. (कधी ?) फुगा वर उडाला. (कोठे ?)

ससा जोराने धावला (कसा ?) मी अनेकदा सांगितले. (किती वेळा ?)

**क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार**

| कालवाचक | स्थलवाचक | रीतिवाचक | परिमाणवाचक / संख्यावाचक |
|---|---|---|---|
| आधी, सध्या, हल्ली, उद्या, नित्य, वारंवार इत्यादी. | सर्वत्र, इथे, जिथे, जिकडे, खाली, मागे, पलीकडे इत्यादी. | पटकन, पटपट, जलद, आपोआप इत्यादी. | किंचित, काहीसा, दोनदा, अत्यंत, मोजके इत्यादी. |



Sample Content

## शब्दयोगी अव्यय

**'शब्दयोगी अव्यय' नेहमी शब्दाला जोडूनच येतात. ते ज्या शब्दांना जोडून येतात त्यांचा त्याच वाक्यातील दुसऱ्या शब्दांशी संबंध जोडण्याचे कार्य करतात.**

**उदा.** माझी शाळा घरा**जवळ** आहे. झाडा**वर** पक्षी बसले होते.

शब्दयोगी अव्ययांचे प्रकार व त्यांची उदाहरणे पुढीलप्रमाणे :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | कालवाचक | पुढे, आधी, नंतर, पर्यंत, पासून | ८. | कैवल्यवाचक | ना, पण, केवळ, फक्त, मात्र |
| २. | स्थलवाचक | आत, बाहेर, मागे, पुढे, नजीक, पाशी, जवळ, समोर | ९. | संग्रहवाचक | सुद्धा, देखील, ही, पण, केवळ, फक्त |
| ३. | करणवाचक | योगे, मुळे, कडून, द्वारा, हाती, करवी | १०. | संबंधवाचक | विषयी, संबंधी |
| ४. | हेतूवाचक | साठी, कारणे, निमित्त, स्तव, करिता | ११. | साहचर्यवाचक | सह, संगे, बरोबर, समवेत, सोबत |
| ५. | व्यतिरेकवाचक | शिवाय, विना, खेरीज, वाचून | १२. | भागवाचक | आतून, पैकी, पोटी |
| ६. | तुलनावाचक | पेक्षा, मध्ये, परीस | १३. | विनिमयवाचक | ऐवजी, बदली, जागी, बद्दल |
| ७. | योग्यतावाचक | योग्य, सम, समान, सारखा, प्रमाणे, वाणी | १४. | विरोधवाचक | उलट, विरुद्ध |

**लक्षात ठेवा**

- 'केवळ', 'मात्र', 'फक्त' हे शब्द शब्दयोगी अव्यये असूनही नामाला जोडून येत नाहीत.
- शब्दयोगी अव्यय व क्रियाविशेषण अव्यय यांमधील फरक पुढील उदाहरणांद्वारे लक्षात येऊ शकतो.

| क्र. | शब्द | शब्दयोगी अव्यय | क्रियाविशेषण अव्यय |
|---|---|---|---|
| १. | समोर | माझ्यासमोर वाघ आला. | समोर वाघ आहे. |
| २. | वर | आम्ही मैदानावर खेळत होतो. | वर काळे ढग दाटून आले. |
| ३. | जवळ | तो माझ्याजवळ आला. | जवळ एक दवाखाना आहे. |
| ४. | मागे | मी घरामागे लपलो. | मागे मोठी विहीर आहे. |

वरील दोन्ही गटांत 'समोर', 'वर', 'जवळ', 'मागे' हे शब्द दिसतात. पहिल्या गटात ते शब्दांना जोडून आले असल्याने ती शब्दयोगी अव्यये आहेत; तर दुसऱ्या गटात ते शब्द स्वतंत्रपणे आले आहेत; तसेच क्रियापदांविषयी विशेष माहिती देत आहेत. म्हणून, ती क्रियाविशेषण अव्यये आहेत.

## उभयान्वयी अव्यय

**दोन किंवा अधिक शब्द अथवा वाक्ये जोडणाऱ्या अविकारी शब्दांना 'उभयान्वयी अव्यये' म्हणतात.**

**उदा.** आणि, किंवा, व, अथवा, परंतु, म्हणून

उभायान्वयी अव्ययांचे प्रकार व त्यांची उदाहरणे पुढीलप्रमाणे :

| क्र. | प्रधानत्वसूचक | गौणत्वसूचक |
|---|---|---|
| १. | समुच्चयबोधक – आणि, व, शिवाय, अन्, आणखी, आणिक, न्, नि | स्वरूपबोधक – म्हणजे, की, म्हणून, जे |
| २. | विकल्पबोधक – अथवा, वा, की, किंवा, अगर | कारणबोधक – कारण का, का की, कारण की, की |

Sample Content

| | | |
|---|---|---|
| ३. | न्यूनत्वबोधक – पण, परंतु, परी, बाकी | उद्देशबोधक – म्हणून, यास्तव, सबब, की, कारण |
| ४. | परिणामबोधक – म्हणून, सबब, याकरिता, तेव्हा, यास्तव | संकेतबोधक – जर-तर, जरी-तरी, म्हणजे, की, तर |

## केवलप्रयोगी अव्यय

**मनातील भावना आपण एखाद्या उद्गाराद्वारे व्यक्त करतो, तेव्हा त्या उद्गारवाचक शब्दांना 'केवलप्रयोगी अव्यय' म्हणतात. विविध भावनांसाठी विविध केवलप्रयोगी अव्यये वापरली जातात.**

केवलप्रयोगी अव्ययांचे काही प्रकार व त्यांची उदाहरणे पुढीलप्रमाणे :

| क्र. | केवलप्रयोगी अव्यय | शब्द |
|---|---|---|
| १. | हर्षदर्शक | अहाहा, आ-हा, आहा, वा, ओहो |
| २. | शोकदर्शक | अगाई गं, हाय, हायहाय, अरेरे, देवारे |
| ३. | आश्चर्यकारक | ओहो, अबब, अहाहा, अरेच्चा, ऑ, बापरे |
| ४. | प्रशंसादर्शक | वाहवा, शाब्बास, छान, ठीक, भले, फक्कड |
| ५. | संमतिदर्शक | ठीक, जी, हां, जीहां, बराय, अच्छा |
| ६. | विरोधदर्शक | छेछे, अंहं, उंहू, हॅट, छट, छे |
| ७. | तिरस्कारदर्शक | शी, हुड, हत्, छत्, थु:, इश्श, छी |
| ८. | संबोधनदर्शक | अरे, अहो, ए, अगा, अगं, रे, बा |
| ९. | मौनदर्शक | चूप, गप, गुपचूप, चुपचाप |

### सराव कृती

**कृ.१. गटात न बसणारा शब्द ओळखा व तो शब्द गटात का बसत नाही यामागील कारण सांगा.**

*i. मी, आपण, रत्ना, त्यांचे

**उत्तर :** ----------

*ii. राहणे, वाचणे, गाणे, आम्ही

**उत्तर :** ----------

*iii. तो, हा, सुंदर, आपण

**उत्तर :** ----------

*iv. भव्य, सुंदर, विलोभनीय, करणे

**उत्तर :** ----------

v. गोडवा, आश्चर्य, रमा, सौंदर्य

**उत्तर :** ----------

vi. फेकले, फोडला, सांडवले, उठला

**उत्तर :** ----------

Sample Content

*कृ.२. विशेष्य-विशेषणांच्या जोड्या लावा.

टाहो · मुलायम · लडिवाळ · तान · स्पर्श · मांडी

झांज · आवाज · आसुसलेला · किरटा · भरभरीत · कुर्रेबाज

| क्र. | विशेषण | विशेष्य | | क्र. | विशेषण | विशेष्य |
|---|---|---|---|---|---|---|
| i. | ------------------- | ------------------- | | iv. | ------------------- | ------------------- |
| ii. | ------------------- | ------------------- | | v. | ------------------- | ------------------- |
| iii. | ------------------- | ------------------- | | vi. | ------------------- | ------------------- |

*कृ.३. 'निर्भय' पासून 'निर्भयता' हे भाववाचक नाम तयार होते. त्याप्रमाणे 'ता', 'त्व', 'आळू', 'पणा' हे प्रत्यय लावून तयार झालेली भाववाचक नामे खालील तक्त्यात लिहा.

| ता | त्व | आळू | पणा |
|---|---|---|---|
| ------------------- | ------------------- | ------------------- | ------------------- |
| ------------------- | ------------------- | ------------------- | ------------------- |
| ------------------- | ------------------- | ------------------- | ------------------- |
| ------------------- | ------------------- | ------------------- | ------------------- |

कृ.४. खालील वाक्यांतील अधोरेखित केलेल्या अव्ययांचा प्रकार ओळखा.

*i. सतीश <u>वारंवार</u> आजारी पडतो. – ----------------------------------------

*ii. रस्त्या<u>वर</u> वाहनांची दुतर्फा गर्दी होती. – ----------------------------------------

*iii. आई सकाळी लवकर उठली <u>कारण</u> तिला आज गावी जायचे होते. – ----------------------------------------

*iv. <u>शाब्बास!</u> खूप छान खेळलास. – ----------------------------------------

v. अमनच्या मना<u>तील</u> भाव कोणी ओळखला नाही. – ----------------------------------------

*कृ.५. खालील शब्दकोड्यामध्ये नामे, सर्वनामे, विशेषण व क्रियापदे लावली आहेत, ती शोधा व दिलेल्या तक्त्यात भरा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| र | अ | न | या | नि | कि | ता |
| मे | ज | य | तु | र | म | जा |
| श | आ | न | म्ही | जा | ला | त |
| सुं | म्ही | सा | ट | हु | र | वा |
| द | क | क्षी | व | शा | श्मी | ना |
| र | ल्प | रा | ट | र | तु | ला |
| त्या | क | ह | वी | तो | षा | मी |
| ला | जा | णे | त | क | र | णे |

उत्तर :

| | |
|---|---|
| **नामे** | |
| **सर्वनामे** | |
| **विशेषणे** | |
| **क्रियापदे** | |

**कृ.६. खालील वाक्यांतील क्रियाविशेषणे अधोरेखित करा.**

*i. सनबर्ड्स फुलाच्या पाकळीवर आरामात बसतात.

*ii. बहिणाबाईंनी सुगरणीच्या चोचीचं अचूक वर्णन केलं.

*iii. तुम्ही पक्ष्यांचे बारकाईने निरीक्षण करा.

*iv. घार आपली शिकार घट्ट पकडते.

v. वीणाने हळुवार डोळे उघडले.

vi. अरुण नेहमी उशिरा येतो.

**कृ.७. खाली दिलेल्या चित्रांसाठी योग्य विशेषण सुचवा व त्याखालील चौकटीत लिहा.**

*i.




*ii.



iii.



iv.



**कृ.८. खालील वाक्यांतील नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय आणि केवलप्रयोगी अव्यय ओळखून तक्ता पूर्ण करा.**

i. लिओनार्दो शिल्पकलेपेक्षा चित्रकलेला जास्त श्रेष्ठ दर्जाची कला मानत असे.

ii. राघव आणि तरुण प्रवासी मोठमोठ्यानं हसले.

iii. अलबत्! आपल्या देशावर प्रेम न करणारे आम्ही करंटे थोडेच आहोत.

iv. अरेरे! फार वाईट घडले.

v. मुले शांतपणे ऐकत होती.

vi. शाळेतील प्रार्थना मंदपणे आपल्या कानांवर येत असते.

vii. शाब्बास! उत्तम गुण मिळवलेस!

viii. माझी शाळा घराजवळ आहे.

Sample content

| क्र. | नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद | क्रियाविशेषण अव्यय | शब्दयोगी अव्यय | उभयान्वयी अव्यय | केवलप्रयोगी अव्यय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| i. | | | | | | | | |
| ii. | | | | | | | | |
| iii. | | | | | | | | |
| iv. | | | | | | | | |
| v. | | | | | | | | |
| vi. | | | | | | | | |

Sample Content

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| vii. | ----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>---------- |
| viii. | ----------<br>----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>----------<br>---------- | ----------<br>----------<br>----------<br>---------- |

**कृ. ९. अधोरेखित शब्दांची जात ओळखून त्यांचा प्रकार ओळखा.**

i. <u>भारत</u> माझा <u>देश</u> आहे.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

ii. <u>जो</u> हुशार असेल त्याला चांगले गुण मिळतील.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

iii. ते <u>फूल</u> खूप <u>सुंदर</u> आहे.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

iv. कामगार <u>रात्रभर</u> काम करत <u>होते</u>.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

v. त्याचे <u>घर</u> जंगला<u>जवळ</u> आहे.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

vi. <u>मी</u> घराबाहेर पडलो <u>आणि</u> पाऊस सुरू झाला.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

vii. <u>स्मिता</u> कविता <u>म्हणते</u>.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

Sample Content

## AVAILABLE BOOKS FOR STD. VIII:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History and Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### NOTES
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- My English Book
- मराठी बालभारती

## AVAILABLE BOOKS FOR STD. IX:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology

### NOTES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान

### WORKBOOK
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती

### ADDITIONAL TITLES
Grammar & Writing Skills Books (Std. VIII & IX)
- Marathi
- Hindi
- English

### OUR PRODUCT RANGE
Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery




Explore our range of STATIONERY

Visit Our Website

Marketed by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

**Address:** 2nd floor, Aroto Industrial Premises CHS, Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road, Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15 • **Website:** www.targetpublications.org • **Email:** mail@targetpublications.org